# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.

फ़ोन :- ०७२१-२६६०९५४
फॅक्स क्र. ०७२१-२६६२१३५

क्र.संगाबाअवि/ ३३५ /२०२२
दिनांक :- १३.०५.२०२२.

प्रति,

प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.

**विषय :- उन्हाळी - २०२२ या परीक्षेतील प्रोत्साहनपर गुण (Incentive Marks) दि.१५/०६/२०२२ पूर्वी पाठविण्याबाबत..**

महोदय / महोदया,

अध्यादेश क्र.१/१९८५, परिच्छेद क्र.७ व सुधारीत अध्यादेश क्र.१/२०१३ मधील तरतुदीनुसार, **उन्हाळी - २०२२** या परीक्षेतील प्रोत्साहनपर गुण (Incentive Marks) सोबतच्या तक्त्यात खालील सूचनांचा कटाक्षाने अवंलब करून, दिनांक १५/०६/२०२२ पूर्वी गोपनीय विभागात जमा करण्यात यावी, ही विनंती.

१. ज्या परीक्षेच्या गुण सुची प्राप्त झालेल्या आहेत, त्याच परीक्षांचे प्रोत्साहनपर गुण (Incentive Marks) सदर गुण तक्त्यात प्रचलित पध्दतीने पाठविण्यात यावे.
२. प्रोत्साहनपर गुण वर्गनिहाय पाठविण्यात यावे.
३. प्रत्येक परीक्षानिहाय **स्वतंत्र प्रोत्साहनपर गुणदानतक्ता** वापरण्यात यावा. तक्त्यावर उजव्या बाजूला महाविद्यालयाचा संकेतांक क्र. ( **College Code No.** ) नमूद करण्यात यावा.
४. विद्यापीठाने पुरविलेल्या **परीक्षा क्रमांकाच्या सुचीवरुन** प्रोत्साहनपर गुणदान तक्त्यावर विद्यार्थ्याच्या नावापूर्वी दर्शविलेल्या रकान्यात परीक्षा क्रमांक नमूद करण्यात यावा.
५. **N.C.C.**चे प्रोत्साहनपर गुणदान तक्ते पाठवितांना, **N.C.C. अधिकाऱ्यांकडून** प्रमाणित करुन पाठवावेत. त्याची स्वतंत्र/वेगळी यादी पाठवू नये.
६. पाठविलेले गुणदान तक्ते प्रमाणित करुन घ्यावयाचे असल्याने त्यासोबत **आवश्यक ती माहिती/प्रमाणपत्राची प्रमाणित केलेली चित्रप्रत** जोडणे अनिवार्य आहे.
७. **आवश्यक प्रमाणपत्रांशिवाय, अपूर्ण व विहित मुदतीनंतर प्राप्त प्रोत्साहनपर गुणदान तक्त्यांचा विचार केला जाणार नाही. तसेच निदेश क्र.२३/२०१५ मधील अ.क्र.(c)(1) नुसार दंड आकारण्याची कार्यवाही करण्यात येईल.**
८. प्रोत्साहनपर गुण पाठवितांना **सर्व विद्यार्थ्याचे गुण एकाच वेळी** पाठविण्यात यावे. कोणत्याही विद्यार्थ्यांचे गुण पाठविण्याचे राहणार नाही, याची पूर्णपणे दक्षता घ्यावी.
९ प्रोत्साहनपर गुणदान तक्त्यामधील जे रकाने रिकामे राहात असेल ते **रकाने रिकामे न ठेवता निरंक** असे त्यात नमूद करावे.
१०. प्रपत्रातील विद्यार्थ्यांच्या नावांमध्ये किंवा गुणांमध्ये कोणत्याही प्रकारची खोडतोड करू नये. व्हाईट इंक सुध्दा लावू नये. खोडतोड किंवा व्हाईट इंक लावलेले प्रपत्र/गुण ग्राह्य धरता येणार नाही.
११. प्रोत्साहनपर गुणदान तक्त्यात खोडतोड करणे आवश्यक असल्यास, खोडावयाचा मजकूर वलयांकित करून अथवा त्यावर रेष ओढून त्यावर अधिकृत व्यक्तीने म्हणजेच ज्या अधिकाऱ्याने तक्ते भरले त्यांनी लघुस्वाक्षरी करावी / कोणत्याही परिस्थितीत Eraser Ink चा वापर होणार नाही याची दक्षता घ्यावी.
१२. सर्व महाविद्यालयांनी प्रोत्साहनपर गुणदान तक्ते प्रत्येक्ष हस्तांतरणाने संपुर्ण माहितीसह पाठवावे.
१३. वरील प्रमाणे प्रोत्साहनपर गुण प्राप्त न झाल्यास व सदर प्रोत्साहनपर गुण विद्यापीठाने विचारात न घेतल्यास त्याची **संपूर्ण जबाबदारी संबंधित महाविद्यालयाची राहील.**

वरील सूचना विचारात घेऊन प्रोत्साहनपर गुण विहित मुदतीपूर्वी पाठविण्याची व्यवस्था करण्यात यावी, या बाबतीत **पुन्हा स्मरणपत्र पाठविले जाणार नाही**, याची कृपया नोंद घ्यावी.

सहपत्र – प्रोत्साहनपर गुणदान तक्ते.

आपला विश्वासू,

सहा.कुलसचिव (गोप.)
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.

# SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY, AMRAVATI

## Award of Incentive Marks Summer 2020 (Sem II) Examination

me of the Collage Session 20 ----- 20--- Examination Summer/ Winter From No.101

de - 106

| | 2 | 3 | 4 | | | | 5 | | | 6 | | | | | | | | 7 | | | | 8 | | 9 | | 10 | | 11 | | 12 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| . . | Roll No. | Name of the Students (Summer First ) | N.C.C. | | | | N.S.S. Only one of a.b. C. Be filled in | | | Games and Soprt | | | | | | | | Cultural Activities | | | | Blood Donation | | Collection of Statistics | | any one of "'a"'or"O" be Filled in | | Total Marks earned | | Totla Which eligble (Marks 10) |
| | | | | | | | | | | Inter Collegiate | | | | Inter University | | | | Inter Collegiate | | Inter University | | | | | | | | | | |
| | | | Praticipation a | B. Cert Exam b | C Cert Exam c | R. Day Parade d | Praticipation a a | Praticipation + 1 camp b | Praticipation + 2 camp c | Games | Marks | Atheletics Events | Marks | Games | Marks | Atheletics Events | Marks | Activity | Marks | Activity | Marks | Date | Marks | Name of the Scheme | Marks | Praticipation a | Praticipation camp b | | | |
| 1 | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| 2 | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| 3 | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| 4 | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| 5 | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| 6 | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |